MHGA110004712025

**न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी  यांचे न्यायालय, कुरखेडा, जिल्हा –गडचिरोली**

(पीठासीन अधिकारी– एन. पी. देशपांडे  )

**किरकोळ फौजदारी अर्ज क्र. ५६/२०२५**

श्री. प्रफुलकुमार बाबुलाल बिंझलेकर,
वयः– ५१ वर्ष, व्यवसाय –  सेवानिवृत्त,
राहणार – गांधी वार्ड देसाईगंज,
जिल्हा –गडचिरोली. .. अर्जदार

विरुध्द

महाराष्ट्र शासन
मार्फत :– पोलीस स्टेशन अधिकारी,
पोलीस स्टेशन कुरखेडा
तालुका–कुरखेडा, जिल्हा – गडचिरोली. .. गैरअर्जदार

**भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ५०३** नुसार अर्ज

---

अर्जदारातर्फे विद्वान अधिवक्ता – श्री. जी.एम. नागमोती,
गैरअर्जदारातर्फे विद्वान अधिवक्ता – श्री. ए.पी. नाकाडे.

---

**आदेश निशाणी क्रमांक ०१ वर**

(दिनांक २४ एप्रिल, २०२६ रोजी घोषित)

प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ५०३ प्रमाणे दाखल केला आहे. अर्जातील मजकूर असा की, अर्जदाराचे स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा देसाईगंज येथे बचत खाते क्र. ३२७६०६१६१७५ असुन अनोळखी इसमाने रक्कम दुप्पट होईल असा आमिष दाखविल्याने त्याने फोन पे द्वारे दि. १०.०७.२०२५ रोजी युटीआर नं ३८१०३३०८९२७१ द्वारे रक्कम रू.

१,००,०००/– पाठविले व त्याची फसगत झाली असे लक्षात येताच त्याने दि. ०६.०८.२०२५ रोजी पोलीस ठाणे कुरखेडा यांचेमार्फत सायबर सेल गडचिरोली यांचेकडे तक्रार दाखल केली. त्यानंतर पोलीस ठाणे कुरखेडा यांनी अनोळखी व्यक्तीच्या बँकेमध्ये ट्रान्सफर झाल्याचे निदर्शनास आले, सदरच्या १,००,०००/– रकमेपैकी रू. २६,९२९.६०/– गोठवण्यात आली आहे. तरी सदरची रक्कम अर्जदाराने सुप्रतनाम्यावर त्याचे अंतिरीम ताबा मिळण्याची विनंती केली आहे.

२. तपासी अंमलदार व सरकारी वकील यांचे म्हणणे मागविण्यात आले. संबंधीत तपासी अंमलदारांनी त्यांचे म्हणणे नि.क्र.०६ खाली सादर करुन नमुद सायबर गुन्हयात अनोळखी इसमाचे बँकेचे खात्यामधील रक्कम रू. १,००,०००/– यावर गेल्याचे व त्यापैकी २६,९२९.६०/– रूपये गोठुन ठेवल्याचे सांगुन अटी व शर्तीनुसार अर्जदाराला देण्यास हरकत नसल्याचे सांगितले आहे. विद्वान सरकारी वकील यांनी अर्जावर म्हणणे देवुन आवश्यकता असल्यावर ते हजर करील नाही म्हणुन अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

३. अर्जदारातर्फे विद्वान विधिज्ञ श्री. नागमोती व शासनातर्फे विद्वान सहाय्यक सरकारी वकील श्री. ए.पी. नाकाडे यांचे म्हणणे ऐकले.

४. अर्जदाराने नि.क्र. ०४ खाली ऑनलाईन तक्रार, पेमेंट पुर्ण झाल्याची रिसीप्ट, अर्जदाराचे बँक खाते व स्टेटमेंटची प्रत, अर्जदाराचे आधारकार्ड इत्यादी कागदपत्रे दाखल केली आहेत. सदर कागदपत्राचे अवलोकन केले असता अर्जदाराचे खात्यातून दि. १०.०७.२०२५ रोजी १,००,०००/– रूपये अनोळखी इसमाचे खात्यावर गेल्याचे दिसुन येते. त्यापैकी तपासी अंमलदाराचे म्हणण्यानुसार त्यांनी अनोळखी इसमाच्या खात्यावर रक्कम रू. २६,९२९.६०/– गोठवण्यात आल्याचे दिसते. कागदपत्रांचे

अवलोकन केले असता प्रथमदर्शनी अर्जदाराची ऑनलाईन फसवणुक झाली असुन त्याला रक्कम रू.२६,९२९/– सुप्रतनाम्यावर देणे न्यायोचित होईल. सबब, मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. पोलीस ठाणे कुरखेडा यांनी स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा देसाईगंज येथे बचत खाते क्र. ३२७६०६१६१७५ मध्ये अर्जदाराची फसवणूक झालेल्या रकमेपैकी गोठवण्यात आलेली रक्कम रू. २६,९२९/– (रुपये सव्वीस हजार नऊशे एकोणतीस फक्त) अर्जदाराला निरक्षणग्राही बंधपत्र म्हणून रक्कम रु.२६,९२९/– अर्जदार याचेकडून घेऊन सदर अर्जदाराचे अंतरीम ताब्यात देण्यात यावी.

३. न्यायालयाचे निर्देशाप्रमाणे अर्जदाराने सदरची रक्कम रु.२६,९२९/– गरज पडल्यास न्यायालयात भरावी व तसे न केल्यास तो शासनास सदरची रक्कम देणेस जबाबदार राहील.

४. तपासी अधिकारी व स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा देसाईगंज येथे बचत खाते क्र. ३२७६०६१६१७५ मध्ये अर्जदाराची फसवणूक झालेल्या रकमेपैकी गोठवण्यात आलेली रक्कम रू. २६,९२९/– देण्याबाबत पत्र देण्यात यावे.

५. येणेप्रमाणे यादी देण्यात यावी.

Digitally signed by NAGESH PRABHAKAR DESHPANDE
Date: 2026.04.24 17:23:06 +0530

(एन. पी. देशपांडे),
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
कुरखेडा

दिनांक :– २४/०४/२०२६.
स्थळ :– कुरखेडा.